जा..क्र. ना. बँका/डी-४/ना. पत/संचालक पात्रता/०७
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक१ सप्टेंबर २००७

# परिपत्रक

नागरी सहकारी पतसंस्था प्रामुख्याने ठेवी गोळा करणे, कर्ज वाटप करणे व कर्ज वसुली करून पुनश्च कर्ज वाटपास निधी उपलब्ध करणे या पद्धतीने कामकाज करीत असतात.

पतसंस्थांमधील ठेवी परत मिळत नसल्याचे अनुषंगाने राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थांचा आढावा घेतला असता कर्ज वाटपातील सदोष पद्धत म्हणजेच कर्ज मर्यादेबाहेर कर्ज वाटप. पुरेसे तारण न घेता कर्ज वाटप्र, कर्ज आर्जची छाननी न करता कर्जवाटप, परतफेडीची क्षमता न तपासता कर्जवाटप हे संस्था अडचणीत येण्याचे प्रमुख कारण असल्याचे निदर्शनास आले आहे.

नागरी सहकारी पतसंस्थामध्ये सदर संस्थेवर संचालक म्हणून काम करीत असलेल्या संचालकांच्या ठेवी, त्या पतसंस्थांमध्ये असतातच असे नाही. किंबहुना असे निदर्शनास आले आहे की, अत्यंत अपवादात्मक स्थितीत पतसंस्थांमध्ये त्या संस्थेच्या संचालकांनी ठेवी ठेवलेल्या आहेत. मात्र या उलट बहुसंख्य पतसंस्थांमध्ये संचालकांनीच कर्ज घेतल्याचे निदर्शनास येते. सदरची कर्जे घेताना किंवा अदा करताना संचालक मंडळ ठेवीदारांच्या हिताचा विचार करताना दिसून येत नाहीत ही बाब विचारात घेता पतसंस्थेच्या संचालकांना ते ज्या संस्थेवर संचालक म्हणून काम करीत आहे त्या पतसंस्थेमध्ये ठेव ठेवणे बंधनकारक करणे आवश्यक वाटते. त्यामुळे ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीनेच संचालक मंडळात निर्णय घेताना ही बाब साह्यभूत ठरेल व संचालकही अत्यंत जबाबदारीपूर्वक व गांभीर्याने संस्थेचे कामकाज पाहू शकतील.

सबब राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थांना लागू केलेल्या आदर्श उपविधीमधील संस्थेच्या संचालक मंडळाची पात्रता यामध्ये दुरुस्ती करण्यात येऊन संचालक मंडळाची निवडणूक पात्रता यामध्ये संचालक मंडळाच्या निवडणुकीत भाग घेवू इच्छिणाऱ्या सभासदाने संस्थेमध्ये स्वत:च्या नावाने खाली नमूद केल्याप्रमाणे ठेव ठेवलेली असली पाहिजे असे बंधनकारक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नागरी विभागाचा प्रकार | कार्यक्षेत्र | संचालकाने ठेवावयाची ठेव रक्कम |
|---|---|---|---|
| १) | राज्य | राज्यस्तर पतसंस्था (एकापेक्षा अधिक विभाग कार्यक्षेत्र) | दिड लाख |
| २) | विभाग | विभागस्तर पतसंस्था (एक विभाग/एकापेक्षा अधिक जिल्हे कार्यक्षेत्र) | ७५ हजार |
| ३) | बृहन्मुंबई | जिल्हा कार्यक्षेत्र | ७५ हजार |
| ४) | बृहन्मुंबई | एक वॉर्ड/प्रभाग | ५० हजार |
| ५) | जिल्हा | जिल्हा | ५० हजार |
| ६) | महानगरपालिका असलेली शहरे | एक वॉर्ड/प्रमाण | ४० हजार |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | तालुका | तालुका | २५ हजार |
| ८) | नगरपालिका असलेली शहरे | एक ते दोन वॉर्ड/प्रभाग | २५ हजार |
| ९) | अन्य नागरी/ग्रामीण शहरे | एक गाव | १० हजार |

अशा संचालकांनी ते ज्या संस्थेच्या संचालक मंडळावर आहेत त्या संस्थेत ठेवलेली ठेव संचालक मंडळाचा कालावधी संपण्यापूर्वी काढून घेतल्यास तो संचालक सदर संस्थेवर संचालक म्हणून करण्यास अपात्र ठरेल.

संस्थेच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या गटातील संचालकांसाठी ठेवींची अट बंधनकारक राहणार नाही.

पतसंस्थतील मागासवर्गीय व महिला संचालकांचे बाबतीत वरील नमूद केलेली ठेव रक्कम कार्यक्षेत्राच्या अनुषंगाने नमूद केलेल्या ठेव रकमेच्या १०% इतकी ठेव बंधनकारक राहील.

सदर ठेवी ह्या कोणत्याही कर्जास तारण म्हणून घेता येणार नाहीत.

तरी राज्यातील सर्व नागरी सहकारी पतसंस्थांनी त्यांचे आदर्श उपविधीमध्ये वरीलप्रमाणे बदल तात्काळ करून घ्यावा.

सर्व विभागीय सहनिबंधक/जिल्हा उपनिबंधक/तालुका निबंधक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील पतसंस्थांच्या निदर्शनास ही बाब आणून देऊन पतसंस्था तात्काळ वरीलप्रमाणे उपविधी दुरुस्ती करून घेतील असे पहावे. तसेच पतसंस्थेच्या निवडणूक कार्यक्रमास मंजुरी देण्यापूर्वी वरीलप्रमाणे पोटनियम दुरुस्ती संस्थेने केलेली आहे किंवा कसे याबाबतची खातरजमा करून व अशी दुरुस्ती केली नसल्यास संस्थेस वरीलप्रमाणे पोटनियम दुरुस्ती करावयास लावून अशी पोटनियम दुरुस्ती केल्यानंतरच निवडणूक कार्यक्रमास मंजुरी देण्यात यावी.

**अनिल डिग्गीकर**
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) तालुका उप/सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (सर्व)
४) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., कोल्हापूर
५) पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., पुणे
६) महाराष्ट्र स्टेट को-ऑप. क्रेडिट सोसा. डिपॉझिट गॅरंटी कॉर्पो. लि., पुणे
७) कार्यासन अधिकारी, निवडणूक शाखा मुख्यालय, पुणे

**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे**